


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख १५ डिसेंबर, १९४८ | अंक ४८


## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विकीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१२,७६० |
| खेळतें भांडवल | रु. | ७०,००,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर



## चलनवाढ कमी करा.

चलनवाढ कमी करण्यास पैशांची बचत करा म्हणून आपल्या राष्ट्रीय सरकारचा आदेश आहे. अशा पैशांचा उत्तम विनियोग म्हणजे एकेरी किंवा मोठ्या हप्त्यांचे विमे घेणें. त्यामुळें चलनवाढ कमी होईलच, पण त्याबरोबर आपणांस मोठ्या रकमेचा विमाही मिळूं शकेल. सह्याद्रि विमा कंपनी लि. नासिक, ही संस्था आपल्या सेवेस सदैव तयार आहे. हप्ते कमी व भरपूर सवलती. योग्य कमिशनवर प्रतिनिधी पाहिजेत. अधिक माहितीसाठीं खालील कचेऱ्यांकडे लिहा अगर भेटाः—— मुंबई, पुणें, कोल्हापूर, रत्नागिरी, बेळगांव, सावंतवाडी, कारवार, हुबळी, म्हापसे, मडगांव, नगर, धुळें, इंदोर, उमरावती, नागपूर, दिल्ली, बडोदें वगैरे.

गो. ग. सौंदणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.







# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**कलकत्त्याचे टेलिफोन**—कलकत्त्याला बसविण्यांत येणाऱ्या ऑटोमॅटिक टेलिफोनच्या व्यवस्थेला सुमारें १५ कोटी रुपये खर्च येईल. पूर्वेकडील देशांत ह्या पद्धतीची टेलिफोनची व्यवस्था हीच सर्वांत मोठी आहे असें म्हणतात.

**इमारतीच्या सामानाची दुर्मिळता**—पोलाद, लोखंड आणि सीमेंटसारख्या, इमारती बांधण्यास लागणाऱ्या वस्तूंचा तुटवडा असल्यामुळें मद्रास सरकारनें त्या वस्तू जरूरी नसणाऱ्या इमारतींच्या बांधकामाला देण्यांत येऊं नयेत, असें ठरविलें आहे. सिनेमागृहें, नृत्यगृहें, सिनेमाचे स्टुडिओ, करमणुकीसाठी बांधण्यांत येणाऱ्या इमारती, इत्यादी प्रकारच्या इमारतींना वरील साहित्य आतां मिळणार नाहीं.

**कूळ कायद्याला मंजुरी देऊं नका**—मुंबई सरकारच्या कूळकायद्याला दुरुस्ती करणाऱ्या बिलाला गव्हर्नर-जनरलनें आपली संमति देऊं नये अशी विनंती धारवाड जिल्ह्याच्या वतनदार आणि इनामदार संघानें गव्हर्नर-जनरल ह्यांना केली आहे.

**आसामच्या युद्धोत्तर योजना**—आसाम सरकारच्या युद्धोत्तर पुनर्घटनेला ४० कोटी रुपये लागतील, असा अंदाज आहे. ही पुनर्घटना पांच वर्षांत पुरी करावयाची आहे. आसाम सरकारनें मध्यवर्ती सरकारला एक खलिता पाठवून पुनर्घटनेला उदार हातानें मदत करण्याची आणि मध्यवर्ती सरकारनें एतद्विषयक मदत कमी करूं नये अशी विनंति केली आहे.

**दारूबंदीच्या भंगाबद्दल अधिक शिक्षा**—दारूबंदीचा भंग करणाऱ्या नागरिकांना अधिक कडक शिक्षा देण्यासाठी मद्रास सरकारनें एका नवीन बिलाचा मसुदा तयार केला आहे. दारूबंदीच्या कायद्याचा भंग करणाऱ्याला ६ महिने ते वर्षभर तुरुंगवास आणि १,००० रुपये ते २,००० दंड करण्याची व्यवस्था नवीन बिलांत करण्यांत आली आहे. शिवाय, कांहीं विशिष्ट परिस्थितींत सामुदायिक दंड बसविण्याचीहि तरतूद करण्यांत आली आहे.

**मुंबई सरकारचा साक्षरता प्रसार**—मुंबई सरकारच्या मजूर खात्याला कामगारांत साक्षरता प्रसार करण्यासाठी १,१६,५०० रुपयांची मदत मिळाली होती. मजूर खात्यानें अहमदाबाद शहरांत आतांपर्यंत शंभर साक्षरता प्रसाराचे वर्ग उघडले आहेत. मार्च, १९४९ पर्यंत वर्गांची संख्या ७०० पर्यंत जाईल. मंत्री श्री. नंदा ह्यांच्या विनंतीला मान देऊन, अहमदाबादच्या गिरणी-मालक-संघानें गिरण्यांच्या आवारांत ह्या वर्गांस जागा देण्याचें कबूल केलें आहे.

**हैद्राबादसाठी अन्नधान्य**—कलकत्ता येथें भरलेल्या अखिल भारतीय अन्नपरिषदेच्या निर्णयाप्रमाणें, हिंदुस्थान सरकारनें हैद्राबाद संस्थानला १५,००० हजार टन अन्नधान्य देण्याचें कबूल केलें आहे. धान्याचा उपयोग येत्या दोन महिन्यांसाठी करण्यांत येणार आहे.

**बागाइतदारांचा ऊंस**—मुंबई सरकारनें फॅक्टरी एरिआंत कालव्यांच्या पाण्यावर ऊंस करणाऱ्या बागाइतदारांवरील बंधनें काढून टाकलीं आहेत. ह्या पूर्वीच्या हुकुमाप्रमाणें, बागाइतदारांना साखरेच्या कारखानदारांना ऊंस विकावा लागत असे. नवीन हुकुमाप्रमाणें त्यांना पाणीपुरवठा पूर्वीप्रमाणेंच होणार असून आपला ऊंस साखर कारखानदारांना विकण्याची अगर त्यापासून गूळ करण्याची मोकळीक देण्यांत आली आहे.

**कारखान्यांना मदत**—मद्रास सरकारनें गेल्या दोन वर्षांत प्रांतांतील कारखानदारांना १९ लक्ष रुपयांची मदत केली.


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें.

हें विद्यालय ता. ३ जानेवारी १९४९ पासून ५, बैरामजी जिजीभाई रोड, येथें सुरू होणार आहे. मॅट्रिक विद्यार्थ्यांनीं व सहकारी खातें व संस्था यांतील हें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्यांनीं ता. २५ डिसेंबरचे आंत अर्ज करावे.

पुणें, ता. १३-१२-१९४८ } बा. वि. कुंभारे सुपरिंटेंडेंट.

## पीपल्स् कॉमनवेल्थ

कोऑपरेटिव्ह कॉलनायझेशन सोसायटी लि.

“ अमृतनगर व सिंहगड-कल्याण शैक्षणिक वसाहत ”.

स्वतंत्र भारतांतील आदर्श शहरें व खेडीं यांचा आदर्श नमुना म्हणून स्थापण्याच्या कामीं सोसायटीचे सभासद होऊन आपलेपणानें सहकार्य करणारांपैकीं

**प्रत्येकाची स्मृति**

या योजनांत उभारण्यांत येणाऱ्या ग्रामदेवता मंदिरें टाऊन-हॉल कारभार-कचेऱ्या, गोशाळा व गोपालन क्षेत्रें, बाजारपेठांचे निरनिराळे विभाग क्रीडांगणें व व्यायाममंदिरें, आरोग्य मंदिरें व आनंदालयें, पोहोण्याचे तलाव, अध्ययन-अध्यापन आश्रम, कृषिक्षेत्रें, वनें, उद्यानें, उपवनें, अशा नानाविध कामांपैकीं योग्य अशा ठिकाणीं प्रत्येक सभासदाच्या इच्छेनुसार

**चांगल्या उपयुक्त स्वरूपांत चिरकाल कायम रहावी**

म्हणून एक खास उपक्रम निश्चित केला आहे. यासाठीं प्लॉट घेतला पाहिजे, घर बांधलें पाहिजे अगर मोठी देणगी दिली पाहिजे असें नाहीं. स्वार्थ व परमार्थ यांच्यांतील कृत्रिम तट पाडून सहज सुंदर मीलन या उपक्रमांत आहे. सभासद नसलेल्या जिज्ञासूंनीं एक आणा पाठवून माहिती मागवावी.

२८२ सदाशिव पेठ, पुणें २. ता. ७-१२-४८ } शंकर रामचंद्र भागवत, मॅनेजिंग डायरेक्टर

# अर्थ

बुधवार, ता. १५ डिसेंबर १९४८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## पाटबंधाऱ्यांच्या योजना स्वावलंबी कशा होतील?

### जमीनमालकावर नव्या पट्ट्या; पाणीपट्टी वाढणार

मुंबई प्रांतांतील पाटबंधाऱ्यांच्या योजना आर्थिक दृष्ट्या सरकारास नुकसानकारक होऊं नयेत, ह्यासाठी आतांपर्यंत अनेक वेळा प्रयत्न करण्यांत आले. कित्येक अधिकारी व कमिट्या ह्यांच्याकडे सूचना करण्याचें काम प्रांतिक सरकारनें वेळोवेळ सोपविलें होतें. विश्वेश्वरअय्या कमिटीनें केलेल्या शिफारसी १९३८ साला प्रसिद्ध झाल्या होत्या, त्यांचा तेव्हांच्या मंत्रिमंडळानें विचार केला होता, आणि त्यावर हुकूमहि सोडले होते. परंतु युद्धास प्रारंभ झाल्यानंतर नवीन पाटबंधाऱ्यांचीं कामें कोणतीच सुरू होऊं शकलीं नाहींत व त्यामुळें सरकारचे हुकूमहि स्थगित झाले. सध्याच्या मंत्रिमंडळानें इरिगेशनच्या मोठाल्या युद्धोत्तर योजना आंखल्या आहेत. त्यामुळें त्यांची भक्कम आर्थिक पायावर उभारणी करण अगत्याचें व तातडीचें झालें आह. म्हणून, मंत्रिमंडळानें एप्रिल, १९४७ मध्यें आपली एक उपसमिति नेमून तिच्याकडे हा प्रश्न सोपविला. पब्लिक वर्क्स खात्याचे मंत्री डॉ. गिल्डर हे तिचे अध्यक्ष असून अर्थमंत्री श्री. मेहता व कृषिमंत्री श्री. पाटील हे तिचे सभासद होते. चालू पाटबंधाऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारणें व नव्या योजना हातीं घेण्यास सरकारास मदत करणें ह्या हेतूनें प्रस्तुत उपसमितीनें जे आर्थिक उपाय सुचविले आहेत, त्यांचें दिग्दर्शन येथें करण्यांत येत आहे.

### बेटरमेंट लेव्ही

पाटबंधाऱ्याच्या कामामुळें जमिनींची किंमत वाढते, परंतु जमिनीच्या मालकानें त्यासाठी कांहींच केलेलें नसतें. तेव्हां, ही वाढलेली सबंध किंमत जमीनमालकास मिळण्याचें कारण नाहीं. त्यांतील कांहीं भाग सरकारानें घेण्यास हरकत नाही. ह्या विचारसरणीस अनुसरून, नव्या पाटबंधाऱ्यांच्या योजनेखालीं येणाऱ्या व त्यांचें पाणी मिळूं शकणाऱ्या सर्व जमिनींस "बेटरमेंट लेव्ही" लावण्यांत यावी, अशी सूचना आहे. कालव्यांचे तीन प्रकार केले जातील:- ( १ ) वर्षभर वहाणारे, ( २ ) आठ महिने वहाणारे आणि ( ३ ) पावसाळी. वर्षभर वहाणाऱ्या कालव्याच्या झोनचेहि दोन प्रकार होतील:-( अ ) बाजारांत किंमत देणारें उसासारखें पीक लावण्यास योग्य ( ब ) इतर. ह्या एकूण चार प्रकारच्या प्रदेशांतील जमिनीवरील बेटरमेंट लेव्हीचा प्रकारहि वेगवेगळा राहील. जमिनीच्या वाढलेल्या किंमतींपैकी ५०% इतकी रक्कम सरकारास घेता येईल, ह्या दृष्टीनें बेटरमेंट लेव्हीची आकारणी होईल. प्रत्यक्ष वसुली खालीलपैकी एका मार्गानें करता येईल:- ( १ ) एका रकमेनें, ( २ ) दर एकरी दरसाल ह्याप्रमाणें कांहीं ठराविक वर्षें लेव्ही आकारून किंवा ( ३ ) लेव्हीची रक्कम जमिनीच्या स्वरूपांत घेऊन. जी जमीन अशा तऱ्हेनें घेतली जाईल, तिची रक्कम हिशेबांत घेताना मूळ दरानेंच किंमत ठरविली जाईल. शेतकऱ्यानें रोख लेव्हीऐवजी जमीन देऊं केली, तरी ती स्वीकारणें किंवा न स्वीकारणें ही सरकारच्या खुषीची गोष्ट राहील. मंदीच्या काळांत लेव्हीची रक्कम कमी करावी किंवा तिची वसुली पुढें ढकलावी काय, ह्याचा सरकार विचार करील. लेव्हीच्या उत्पन्नाचा एक स्वतंत्र "प्रांतिक इरिगेशन फंड" निर्माण करण्यांत येईल व त्या फंडाचा विनियोग नव्या पाटबंधाऱ्याच्या योजनांस पैसा पुरविण्याकडे केला जाईल.

### इरिगेशन सेस

कालवे ज्या प्रदेशास पाणी पुरवूं शकतील, अशा प्रदेशांतील जमिनीवर " इरिगेशन सेस " सुचविण्यांत आला आहे. जमिनीचा मालक पाणी घेवो अगर न घेवो, त्यानें ही पट्टी दिली पाहिजे; कारण पाण्यास मागणी असो वा नसो, कालवा वहाता ठेवावाच लागतो व त्यासाठी खर्च करावा लागतो. जेथें बारा महिने पाणी मिळतें तेथें व इतरत्र एकाच दरानें पट्टी आकारली जाणार नाहीं हें उघड आहे. परंतु तेजी किंवा मंदी ह्यावर ही पट्टी अवलंबून रहाणार नाहीं; ती दरसाल एकाच दरानें वसूल केली जाईल. सर्व प्रांतभर शक्य तर एकाच दरानें ती आकारण्यांत येईल. बारा महिने पाणी मिळूं शकणाऱ्या कालव्याचे प्रदेशांत ती दरसाल दर एकरी ३ रुपये असावी व पाण्याच्या बाकीच्या प्रदेशांत ती दर एकरी १ रु.८ आ. असावी, अशी उपसमितीची सूचना आहे. चालू व नवे कालवे ह्या सर्वांस ही पट्टी लागू होईल.

### पाणी पट्टींत वाढ

पाण्याच्या प्रत्यक्ष उपयोगाकरिता सरकारास याव्या लागणाऱ्या पट्टीस पाणीपट्टी म्हणतात. पाटबंधाऱ्यांच्या योजनेवर जो भांडवली खर्च झालेला असतो, त्यावरील व्याजाचा खर्च सुटावा, हा त्या पट्टीचा मुख्य उद्देश. पुऱ्या झालेल्या योजनांचा विचार करताना गुंतविलेलें भांडवल ह्याचा अर्थ एकूण झालेला खर्च, असा समजण्यांत येईल. नव्या योजनांचे बाबतींत वेगवेगळ्या मोसमांची व वेगवेगळ्या पिकांची पाणीपट्टी ठरवून देण्यांत यावी. गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक ह्या तीन्ही ठिकाणीं ह्या पट्टीचा दर एकच राहील असें नाहीं; परंतु एका ठिकाणच्या सर्व पाटबंधाऱ्यांचे बाबतींत मात्र पट्टीचे संबंधांत एकवाक्यता असावी. महाराष्ट्रांतील पाणीपट्टी २५% वाढविण्यांत यावी असें उपसमितीनें सुचविलें आहे. मात्र, बागाइतदारांना एका वर्षाची आगाऊ सूचना देऊनच ही वाढ केली जाईल.

---

### नवे सहकारी कानू

(४५ अ) कंझ्युमर्स सोसायटीचे सभासद होण्यास पात्र असणाऱ्या कोणासहि, पुरेसें कारण न दाखविता सोसायटी सभासदत्व नाकारूं शकणार नाहीं.

(४७ अ) कंझ्युमर्स सोसायटीच्या कोणत्याहि सभासदानें, सोसायटी ज्या प्रकारचा व्यवहार करीत असेल त्याच प्रकारचा व्यवहार करतां कामा नये. फेडरल सोसायटीच्या अध्यक्षांची परवानगी घेऊन मात्र तसा व्यवहार करतां येईल.

## कारखानदारांपुढील कांहीं अडचणी

### रोकड पैशाची तंगी : कामगारांचा प्रश्न

किर्लोस्कर बंधु लि. ची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत झाली. कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन, श्री. सरदार जगन्नाथ महाराज, ह्यांच्या अध्यक्षीय भाषणांत कांहीं निकडीच्या व महत्त्वाच्या प्रश्नांचें दिग्दर्शन केलेलें आढळतें. ह्या प्रश्नांचें व्यापक स्वरूप लक्षांत घेतां त्यांचा परामर्श येथें घेणें आम्हांस अगत्याचें वाटतें. समग्र अध्यक्षीय भाषण मागाहून देण्यांत येईल. गेल्या सहा सात वर्षांत गिरण्यांच्या व कारखान्यांच्या यंत्रसामुग्रीवर फार ताण पडला असून ती बदलण्याची वेळ आलेली आहे. त्याचप्रमाणें, ह्या मुदतींत यंत्रसामुग्रींत बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत, त्यामुळें सध्यांची यंत्रसामुग्री जुनी व अगदीं निरुपयोगी नसली तरी कमी उपयोगी तरी खास बनली आहे. सध्यांच्या स्पर्धेच्या काळांत नव्या व अद्यावत यंत्रसामुग्रीचे अभावीं, कारखानदारींतील नेतृत्व टिकविता येणें अशक्य आहे. परंतु आज यंत्रांचे भाव तिपटीपेक्षांहि ज्यास्त झाले आहेत, आणि आजवर काढलेला घसारा सहाजिकच जुनीं यंत्रें बदलून नवीं घेण्यास अगदींच अपुरा पडणें स्वाभाविक आहे. श्री. सरदार जगन्नाथ महाराजांनीं, ह्या अडचणींचा उल्लेख आपल्या भाषणांत वरीलप्रमाणें केला. कारखान्यांचा फार मोठा पैसा आगाऊ रकमा भराव्या लागण्याच्या पद्धतीमुळें अडकून पडतो आणि बऱ्याच कंपन्यांना जवळची रोकड व बँकांतील शिल्लक रोजच्या व्यवहारास अपुरी पडते, असा कारखानदारांचा अनुभव आहे. त्यामुळें पैशाची तंगी निर्माण होते. दक्षिणेंतील कित्येक कारखानदारांवर संस्थानांच्या विलिनीकरणामुळें नव्या जबाबदाऱ्या येत आहेत. मुंबई प्रांतांतील सर्व कायदे त्यांना लागू होत आहेत. त्यामुळेंहि रोकड रकम ज्यास्त लागते, असाहि मुद्दा महाराजांनीं मांडला आहे. आगामी मंदीच्या छायेची ह्या अडचणींत भर घातली, म्हणजे कारखानदारांनीं स्वतःजवळ असलेली व जमवलेली पुंजी खर्चून न टाकतां किंवा वाटून न टाकतां, जतन करून ठेवणें कसें इष्ट आहे, हें महाराजांनीं स्पष्ट केलें. किर्लोस्कर बंधु लि. च्या चेअरमनच्या भाषणांत सध्यां कारखान्यांना भासत असलेल्या अडचणी उत्कृष्ट रीतीनें सूचित करण्यांत आल्या आहेत. कोठल्याहि उद्योगधंद्यांत वेतन हें कामगारांच्या उत्पादनावरच अवलंबून असतें आणि दरमाणशीं उत्पादन वाढलें तरच कारखानदार वेतनवाढ देऊं शकतो, ही गोष्ट खरी असली तरी ती कामगारास केव्हां पटणार कोण जाणे! किर्लोस्करांसारखे प्रगतिप्रिय कारखानदार कामगारांस न्याय्य वांटा देण्यास सदैव तत्पर असतात, हें सुप्रसिद्धच आहे. त्यांच्या ह्या धोरणाचें कामगारांनीं चीज केलें तर त्यांत सर्वांचेंच व समाजाचेंहि हित आहे. उत्पादनवाढीस व कार्यक्षमतेस कामगारांनीं मनःपूर्वक हातभार लावून, कारखानदारीच्या प्रगतीस मदत केली नाहीं तर कामगारांचें सध्यांचें वेतनहि टिकणें कठीण जाईल अशी भीति वाटते. कारखान्यांच्या इतर अडचणींत कामगारांनीं भर न घालतां, आपलें धोरण सहकार्याचें ठेवणें अत्यावश्यक आहे. कार्यक्षमता वाढवून जादा वेतनाची मागणी त्यांनीं केली तर ती कोणत्याच कारखानदारास नाकारता येणार नाहीं; ती नाकारणें त्याच्या स्वतःच्याहि हिताचें होणार नाहीं. जादा वेतन मिळविण्याचा व टिकविण्याचा एकमेव मार्ग कार्यक्षमतेंत व उत्पादनांत वाढ, हाच आहे.

---

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

### वार्षिक अहवालांतील महत्त्वाच्या बाबी

(१) ३० सप्टेंबर, १९४८ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीनें एकूण ६२ लक्ष रुपयांची विक्री केली. अबकारी कर ३ लक्ष, ८० हजार रु. भरला. व्याज ३ लक्ष, ९९ हजार रु. दिलें. महात्मा गांधी स्मारक निधीस ६५ हजार रुपयांची ची देणगी देण्यांत आली. ८५ हजारांचा घसारा काढला. ताळेबंदांत २ लक्ष, ७५ हजार रु. नफा ओढला.

(२) नफावाटणीसाठी ३ लक्ष, ३९ हजार रु. आले. प्रेफरन्स भागांवर ५% व ऑर्डिनरी भागांवर १०% डिव्हिडंडला १,०७,७०० रु. लागतील. पुढील वर्षासाठीं १,०८,८९० रु. शिल्लक राहील.

(३) प्रतिकूल परिस्थिति; म. गांधींच्या दुःखद वधानंतरच्या दंगलात सिंडिकेटचें झालेलें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नुकसान; त्यामुळें लांबलेला हंगाम, पडलेला कमी उतारा व जळणाचा आणि मजुरीचा वाढता खर्च; मुंबई सरकारची ऊंस गाळणीवरील पट्टी (२,९४,५५० रु. ताळेबंदांत देणें म्हणून बाजूस काढले आहेत); डिस्टिलरीच्या उभारणींत आलेले सरकारी धोरणाचे व्यत्यय, इत्यादि अडचणींतूनहि मॅनेजिंग एजंटांनीं यशस्वी रीतीनें मार्ग काढला आहे.

---

## किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी

वरील कंपनीनें ३० जुलै १९४८ अखेर संपलेल्या वर्षी सर्व घसारा खचवजा जातां १८,१७,७१२ रु. ठोकळ नफा मिळविला. व्यवस्था खर्च, इतर खर्च, उत्पन्नावरील कर, मॅ. एजंटांचें कमिशन, कामगारांस बोनस इत्यादि भागवून अहवालाचे वर्षी २,५२,३३६ रु. निवळ नफा झाला. भागीदारांना ६% डिव्हिडंड +६% बोनस ह्यांस १,७४,००० रु. लागले व ८०,००० रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केले. अहवालाचे वर्षांत डायरेक्टरांनीं म. गांधी स्मारक व इतर फंडास १७,८०० रु. च्या देणग्या दिल्या. कामगारांना त्यांना मिळालेल्या एकंदर बेसिक पगाराच्या ½ इतकी रकम बोनस म्हणून देण्यांत येणार आहे, त्यासाठीं २,१५,००० रुपयांची तरतूद केलेली आहे. वार्षिक सभा ता. ११ रोजीं झाली.

---

## जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि., भिवंडी

ह्या कंपनीची वार्षिक सभा ता. १२ रोजीं झाली. कंपनीनें ३० जून, १९४८ अखेरच्या वर्षी ६,३६,३०३ रुपयांच्या मालाची विक्री करून २,००,५३५ रु. ठोक व ९५,३०३, रु. निवळ नफा मिळविला. ऑर्डिनरी भागांवर ६% करमाफ डिव्हिडंड देण्यास २७,१७० रु. लागले. रिझर्व्ह फंडांत १० हजारांची भर घालण्यांत आली व ५ हजार रु. चा इन्शुअरन्स रिझर्व्ह निर्माण करण्याकडे विनियोग करण्यांत आला. कंपनी ४ लक्ष रुपये दर्शनी किंमतीचे सरकारी रोखे धारण करीत आहे. त्यामुळें तिला जरूर तेव्हां अल्प व्याजानें केव्हांहि रोख रकम उभी करता येते, हें ह्या कंपनीचें वैशिष्ट्य आहे. एकूण १३ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी भागभांडवल व रिझर्व्ह ह्यांची रकम ८ लक्ष, ६० हजार रु. आहे.

## सरकारला धान्य विका

### खरेदीची किंमत वाजवी आहे

मुंबई सरकारनें १९४८--१९४९ सालासाठीं नियंत्रित अन्न-धान्यांच्या ज्या किंमती ठरविल्या आहेत, त्यांबद्दल शेतकऱ्यांचा कांहीं गैरसमज झालेला होता. त्या गैरसमजाचें निराकरण करण्यासाठी मुंबई सरकारनें एक पत्रक काढलें आहे. डिसेंबर, १९४७ मध्यें धान्यावरील नियंत्रणें काढून टाकलीं तेव्हां ज्या किंमती होत्या त्याच्यापेक्षां ५० टक्के अधिक सरकारनें जाहीर केलेल्या नव्या किंमती नाहींत, असा समज प्रसृत झालेला होता. पण खरी परिस्थिति पुढीलप्रमाणें आहे.

हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांना अशी परवानगी दिली होती कीं, विनियंत्रणाच्या वेळीं ज्या किंमती असतील त्याच्यापेक्षां २५ टक्के अधिक किंमती त्यांनीं धान्य वसुली करतांना ठरवाव्या. ही मर्यादा अधिकांत अधिक म्हणून ठेवण्यांत आली होती. फक्त कांहीं विशिष्ट परिस्थितींत मात्र धान्यवसुलीच्या किंमती ५० टक्क्यांनींही अधिक ठेवण्याची सवलत दिलेली होती. विनियंत्रणाच्या कालांत मुंबई प्रांतांत धान्याच्या किंमती बऱ्याच वाढल्या. त्या किंमतींचा विचार करून आणि प्रांतांतल्या प्रांतांत अधिकांत अधिक धान्यवसुली व्हावी म्हणूनच केवळ विनियंत्रणापूर्वी चालू असलेल्या बाजारभावापेक्षां ५० टक्के अधिक किंमती ठरविण्याला परवानगी देण्यांत आली. इतर प्रांतांतून आणि संस्थानांतून विनियंत्रणापूर्वी ज्या किंमती होत्या त्यांच्या २५ टक्केच अधिक किंमती ठेवण्याचें निश्चित झालें आहे. अर्थात् च मुंबई प्रांतांतील शेतकऱ्याला सरकारनें धान्यवसुलीच्या किंमतीबाबत अन्यायानें वागविलें असें म्हणतां येणार नाहीं. मुंबई सरकारनें आतां असें जाहीर केलें आहे कीं, १९४८-४९ सालासाठीं धान्यवसुलीच्या ज्या किंमती ठरविण्यांत आल्या आहेत, त्या हिंदुस्थान सरकारच्या सूचनांप्रमाणें अधिकांत अधिक आहेत. त्या किंमतींत आणखी वाढ ह्यासाठीं करण्यांत येणार नाहीं. १ मार्च, १९४९ नंतर भात, तांदूळ, मका आणि बाजरी ह्यांची जी सक्तीची धान्यवसुली होईल, त्यावेळीं ह्या धान्यांच्या किंमती नियंत्रणापूर्वीच्या किंमतींपेक्षां फक्त ३३⅓ टक्केच अधिक दिल्या जातील. १ मे, १९४९ नंतर होणाऱ्या ज्वारी व गव्हाच्या वसुलीलाहि वरील प्रमाणेंच किंमत देण्यांत येईल. तेव्हां शेतकऱ्यांनीं आपल्या जवळील वरकड धान्य शक्य तितक्या लवकर सरकारला विकणें हेंच त्यांच्या हिताचें आहे, याविषयीं शंका येण्याचें कारण नाहीं.

### मुंबई सरकारची मोटार सर्व्हिस

मुंबई सरकारनें मोटारीच्या वाहतुकीच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयोग चालविला आहे. हा धंदा हातीं घेण्यांत जनतेला योग्य दरांत वहातुक करतां यावी असा हेतु आहे. सध्या चालू असलेल्या वाहतुकीच्या मार्गावर काय सुधारणा करतां येतील ह्याबद्दल नागरिकांनीं विधायक सूचना कराव्या अशी सरकारची इच्छा आहे. खात्यांतील नोकरांची गैरवर्तणूक अगर अप्रामाणिकपणा लोकांनीं उघडकीस आणावा. त्याचप्रमाणें तिकिटें न घेतां प्रवास करणाऱ्यांनाही तसें करूं देऊं नये. तक्रारी अगर सूचना स्टँडवरील पेटींत टाकाव्या अगर मोटार ट्रॅन्सपोर्ट कंट्रोलर, एशिअन बिल्डिंग, ग्लोब मिल पॅसेज, वरळी, मुंबई, नं.१८ ह्या पत्त्यावर पाठवाव्या.

## परदेशांतील बातम्या

**ब्रिटनची चॉकोलेटची निर्यात**—ह्या वर्षातील पहिल्या दहा महिन्यांत स्वीत्झरलंडनें इंग्लंडकडून ७० लाख फ्रॅंकचें चॉकोलेट विकत घेतलें. स्वीट्झरलंड देशांत स्वतःचा असा चॉकोलेटचा धंदा आहे. तथापि स्वीट्झरलंडप्रमाणें उत्तर अमेरिकेलाही ब्रिटननें वरील मुदतींत २० लाख डॉलर्सचा कोको आणि चॉकोलेट विकलें आहे. ब्रिटनमधील दोन कंपन्यांनीं चालू वर्षाच्या पहिल्या दहा महिन्यांत १५ लाख पौंडाचा ( आदमासें २ कोटी रुपयांचा ) माल निर्यात केला.

**रशिआ अमेरिकन फिल्म्स दाखविणार**—अमेरिकेंत तयार झालेल्या १०० बोलपटांची एक यादी रशिअन सरकारकडे पाठविण्यांत आली आहे. त्यांतील कांहीं बोलपट रशिआंत दाखविण्यासाठीं पसंत करण्यांत येणार आहेत. अमेरिकन बोलपट रशिआंत दाखविण्यासाठीं अमेरिका आणि रशिआ ह्यांच्यांत एक करार झालेला आहे. हा करार अमेरिकन बोलपट-निर्मात्यांच्या संघाचे अध्यक्ष मि. जॉनस्टन ह्यांनीं घडवून आणला. प्रे. ट्रूमन ह्यांनींही ह्या कामीं बरेंच औत्सुक्य दाखविलें. रशियाप्रमाणेंच झेकोस्लोव्हाकिआ आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांकडेही अमेरिकन बोलपटांची एक यादी पाठविली जाईल.

**जगांत सायकली किती आहेत ?**—आज जगांत अंदाजे ७ कोटी सायकली आहेत. ब्रिटनमधून चालू वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत सायकली आणि त्यांचे सुटे भाग मिळून १,२०,१५,-६०३ पौंड किंमतीचा माल निर्यात करण्यांत आला. इंग्लंडमध्यें १ कोटी सायकलस्वार असावेत; त्यापैकीं १ लाख सायकलविषयक संघ आणि क्लब्स ह्यांचे सभासद आहेत. युद्धापूर्वीपेक्षां तिप्पट सायकली आज ब्रिटन परदेशांतून विकत आहे. सायकलीचा शोध मॅकमिलन नांवाच्या स्कॉटिश एंजिनिअरनें लावला.

**अमेरिकेंतील बेकारी**—अमेरिकन मध्यवर्ती सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या आंकड्यावरून, अमेरिकेंत ऑक्टोबर, १९४८ मध्यें १९,४२,००० लोक बेकार होते. शांततेच्या कालांतील बेकारांच्या संख्येंत ही संख्या सगळ्यांत कमी आहे. देशांतील काम करूं शकणाऱ्या लोकांशीं बेकार लोकांचें प्रमाण २२·७ टक्के पडतें.

**रशिआला युद्धसामुग्री**—रशिआनें बर्लिनची कोंडी उठविली नाहीं तोपर्यंत त्याला युद्धोपयोगी माल धाडण्यांत येऊं नये अशी सूचना ब्रिटिश पार्लमेंटांत करण्यांत आली होती. तथापि, परदेशीय खात्यातर्फे ही सूचना मान्य करण्यांत आली नाहीं. रशिआ आणि पश्चिमेकडील युरोपिअन राष्ट्रें ह्यांच्यांत जोपर्यंत फक्त धुसफुशीचें वातावरण आहे, तोपर्यंत ह्या प्रश्नाचा आपण शांत डोक्यानेंच विचार केला पाहिजे, असें उत्तर परदेशीय खात्यातर्फे देण्यांत आलें.

**अमेरिकेचें वैमानिक दल**—चीनमधील घडामोडी पाहतां, पश्चिम युरोपांतील राष्ट्रांनीं अमेरिकेच्या विमानदलावर फारसें अवलंबून राहूं नये, असे विचार मि. क्रॉसमन नांवाच्या ब्रिटिश मजूर पुढाऱ्यानें एका लेखांत व्यक्त केले आहेत. क्रॉसमन पुढें म्हणतात कीं, चांग-कै- शेकच्या सरकारला अगदीं आधुनिक पद्धतीचीं बॉंब फेकणारीं व लढाऊ विमानें अमेरिकेनें पुरविलीं होतीं. उलट, चिनी कम्युनिस्टांजवळ विमानें मुळींच नव्हतीं. ह्यावरून युरोपचें कम्युनिझमपासून रक्षण करण्यासाठीं अमेरिकेच्या विमानदलाची मदत होईल अशी आशा करणाऱ्यांना इषारा मिळण्यासारखा आहे.

## "वेस्टर्न इंडिया"च्या पुणें शाखेंतील संमेलन व सत्कार-समारंभ

### शाखाधिकारी, श्री. खांडेकर, ह्यांचें भाषण

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या एजंटांचें संमेलन व चेअरमन डॉ. आगाशे ह्यांचा सत्कार ता. २० नोव्हेंबर रोजीं पुणें येथें घडवून आणल्यावेळच्या सभेंत, पुणें शाखाधिकारी श्री. कृ. ग. खांडेकर ह्यांनीं खालीलप्रमाणें प्रास्ताविक भाषण केलें:—

### मूल्यमापनांतील यश

"१९४७ सालअखेरचें कंपनीचें पांचवें मूल्यमापन नुकतेंच पूर्ण झालें असून सरकारी मंजुरी आल्यावर जाहीर व्हावयाचें आहे. परंतु, आपणांस सांगावयास हरकत नाहीं कीं, व्याजाचा दर तीन टक्के धरूनही पूर्वीचेच बोनसचे दर आपण कायम ठेवूं शकतो ... म्हणजे ८ व १० हेच बोनसचे दर राहतील व त्याशिवाय बरीच मोठी रक्कम आपण रिझर्व्ह फंडांत ठेवूं शकतो. फारच थोड्या कंपन्यांनीं अलीकडे बोनस जाहीर केलें आहे आणि एकट्या ओरिएंटल शिवाय दुसऱ्या कोणत्याही कंपनीनें इतकें बोनस जाहीर केलेलें नाहीं, ही गोष्ट विचारांत घेतली म्हणजे आपल्या कंपनीच्या यशाचें महत्त्व लक्षांत येईल.

### "साजन का घर"

"येथील नवयुग चित्रपट कंपनीनें "साजन का घर" नांवाचा चित्रपट नुकताच तयार केला आहे. त्यांत कथानकामध्येंच विमाविषयक विवरण केलें आहे व त्या अनुषंगानें ठिकठिकाणीं आपले कंपनीबद्दल उल्लेख आला असून अप्रत्यक्षपणें आपली चांगली जाहिरात झाली आहे. आपली पॉलिसी, विमाअर्ज, वगैरेचें चित्रणही एक दोन ठिकाणीं आहे. ही अभिनव कल्पना आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ जोशी यांची असून, पुढील चित्रीकरणाचें अम्मलबजावणीचें श्रेय त्यांनाच असून त्यांचेच देखरेखीखालीं हे काम झालें आहे. "साजन का घर" हा चित्रपट आपण अवश्य पहावा.

### डॉ. आगाशे ह्यांच्या कारकीर्दींतील ठळक गोष्टी

"कंपनींतील नोकरवर्ग अधिक कार्यक्षम व्हावा व विमा विषयाची सविस्तर माहिती असावी या हेतूने, 'चिरमुले इन्स्टिट्यूट ऑफ इन्शुरन्स' ही संस्था स्थापन झाली आहे व तेथें लाईफ ऑफीसेसच्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांस शिक्षण दिलें जातें. त्याचप्रमाणें, "वेस्टर्न इंडिआ ट्रस्टी कंपनी" ही लोकोपयोगी संस्थाही नुकतीच स्थापन झाली असून या सोयीचा फायदा जनता घेईल, असा विश्वास वाटत आहे. येवढ्यांतच मला वाटतें दोन तीन लाखांचें ट्रस्टीचें काम कंपनीकडे आलें आहे. कंपनीचें छपाईचें काम पुष्कळच असतें, इतकें कीं एखाद्या छापखान्यास तें काम पुरेसें आहे असें आढळून आल्यावरून कंपनीनें एक स्वतःचा प्रिंटिंग प्रेसही सातारा येथें काढला आहे.

"विमेदारांचे दृष्टीनेंही पॉलिसीवरील कर्जाचे व्याजाचा दर सहा टक्के करणें, वेळेवर हप्ता भरला नसल्यास तीन महिनेपर्यंत आरोग्याचा दाखला दिल्याशिवाय पॉलिसी चालू करण्याची सवलत, वगैरे सुधारणा झाल्या आहेत.

"आपल्यास एक महत्त्वाची व आनंदाची बातमी सांगावयाची म्हणजे कंपनीनें लक्ष्मीरोडवरील उंबऱ्या गणपतीशेजारीं श्री. पुराणिक यांची प्रशस्त जागा खरेदी केली असून, त्या ठिकाणीं कंपनीची स्वतःच्या मालकीची टोलेजंग इमारत व्हावयाची आहे व जागेची अनेक दिवसांची नड दूर होणेचे मार्गांत आहे. इंदोर, दिल्ली, येथेंही कंपनीनें स्वतःच्या इमारती घेतल्या असून दिल्लीचें आपलें ऑफीस आपले स्वतःच्या जागेंत गेलेलें आहे."


# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी:— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.
(मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली)

स्थापन साल १९११

चेअरमन:-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २७,२१,००० |
| ठेवी | रु. ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५१ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.









### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# आपल्या पुढील कांहीं प्रश्न

## निश्चित धोरण व कष्ट ह्यांची आवश्यकता

( १ )

सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या हे वयोवृद्ध,ज्ञानवृद्ध आणि विचारवंत देशभक्त आहेत. ८८ व्या वर्षी देखील अद्यावत् माहिती-ज्ञान मिळविण्याच्या खटपटींत ते गढलेले आढळतात. हिंदुस्थानाचे ते उद्योगमहर्षि आहेत. आर्थिक नियोजनाचा, औद्योगीकरण्याचा गुरुमंत्र त्यांनींच दिला.

तज्ञ इंजीनिअरनें काढलेला नकाशा-चित्र स्पष्ट, खुलासेवार, निश्चित मोजमापाचें असतें. सर विश्वेश्वरय्या मूळ त्या पेशाचेच असल्याकारणानें त्यांचें लिहिणें-बोलणें नेहमींच सुस्पष्ट असतें. त्यांत कल्पनेच्या भराऱ्या नसतील; भावनांचा विलास नसेल; शब्दांचे फुलारे नसतील. तथापि त्यांत विचारपूर्वक निश्चित केलेल्या योजना आढळतील, अन् मला वाटतें आजच्या घडीला निकड आहे ती कार्यनिश्चितीची, योजनेची. सर विश्वेश्वरय्यांचें कार्य नेहमींच विधायक असतें.

म्हैसुर विद्यापिठाच्या पदवीदानसमारंभाच्या प्रसंगीं त्यांनीं आपल्या नेहमींच्या मूलग्राही पद्धतीनें स्वतंत्र भारताचे प्रश्न हाताळले; तरूण पिढीपुढील कार्याबाबत मार्गदर्शन केलें.

"माझ्या डोळ्यासमोर, माझ्या जीवन काळांत हिंदुस्थानची लोकसंख्या जवळजवळ दुप्पट झाली आहे." अर्थातच यापुढील काळांत ती ह्यापेक्षांही अधिक झपाट्यानें वाढेल. हैद्राबाद धरून स्वतंत्र भारताची आजची लोकसंख्या अदमासें ३२ कोटि भरेल. दर वर्षाला ५० ते ६० लाखांची त्यांत भर पडत आहे. त्या प्रमाणांत उत्पादन वा उत्पन्न वाढलेलें दिसत नाहीं. अशा स्थितींत रहाणीचें मान उतरत असल्यास त्यांत नवल नाहीं. लोकसंख्येत फाजील वाढ होऊं न देण्याबाबतची संततीनियमाची माहिती जनतेला पुरविण्याची व्यवस्था पश्चिमात्य देशांतील सरकार करीत असतें. आपल्या देशांतही तसे प्रयत्न थोड्याफार प्रमाणांत चालू आहेत पण परिणामकारी होण्यास ते मोठ्या प्रमाणावर होणें आवश्यक आहे.

ओघानेंच साक्षरता, शिक्षण यांचा प्रश्न येतो. शिक्षणानें मनुष्य विचारक्षम होतो. औद्योगीकरणाचा परिणामही लोकसंख्येला आळा घालण्यांत होतो, असा युरोपिअन देशांतील अनुभव आहे. हिंदुस्थानांतील पारसी मंडळी सुशिक्षित व उद्योगधंद्यांतली आहेत. त्यांची एकूण लोकसंख्या फक्त १,१४,००० आहे. गेल्या कांहीं वर्षांत जननांचा आकडा झपाट्यानें खालीं उतरत आहे.

जरूर तर सक्तीचें शिक्षण करून पुढील १०-१२ वर्षांत देशांत एकही निरक्षर राहणार नाहीं अशी व्यवस्था झाली पाहिजे, असें अत्यंत कळकळीनें सर विश्वेश्वरय्यांनीं सांगितलें.

देशांतील ६७ ते ७० टक्के मंडळी शेतीवर अवलंबून आहेत. इतर जीवितव्यवसाय पुरवून शेतीच्या धंद्यांवरील हें दडपण कमी केलें पाहिजे.

शेतकी-प्रधान देश असूनही अन्न-धान्याबाबत आम्ही स्वयंपूर्ण नाहीं ! परदेशांतून दरवर्षी अदमासे २० लक्ष टनांची आयात हल्लीं चालू आहे. आधुनिक यंत्रसामुग्री व खतें यांचा उपयोग करून शेती-उत्पादन वाढवितां येईल. अमेरिकेंत रु. १,४००, इंग्लंडांत रु. ९८० व हिंदुस्थानांत रु. ६५ दर माणशी शेतीच्या वार्षिक उत्पन्नाचे आंकडे आहेत !

आजच्या स्फोटक परिस्थितींत आपण औद्योगीकरणाच्या तांबडतोब तयारीस लागावें हें बरें.

या दिवसांत संरक्षणाकरितां लागणारी यंत्रसामुग्री, लढाऊ साहित्य किंवा माहिती व अनुभवी माणसें याकरितां परदेशावर अवलंबून राहणें हिताचें नाहीं. परराष्ट्रांत नवीन-नवीन रणसाहित्यें तयार होतील, त्याबाबत सतत माहिती मिळविण्याची व्यवस्था करावयास पाहिजे. देशांत लष्करी शिक्षण देणाऱ्या भरपूर संस्था स्थापन झाल्या पाहिजेत. विमान, मोटारी इत्यादि संरक्षणाकरितां लागणारें सर्व साहित्य येथेंच तयार केलें पाहिजे.

तसेंच राष्ट्रीय उत्पन्न वाढवावयाचें, रहाणीचें मान सुधारावयाचें व दैनंदिन जीवन धारणेस लागणाऱ्या हरेक वस्तू व सुखसोयी किमान खर्चांत उपलब्ध करावयाच्या, तर औद्योगीकरणाखेरीज दुसरा तरणोपाय नाहीं. औद्योगिक क्षेत्रांत आपलें पाऊल पुढें न पडण्याचें मुख्य कारण निश्चित धोरण व योजना यांचा अभाव हेंच आहे.

याच कारणानें देशांत बुद्धि व शक्ति भरपूर असूनही त्यांचा उपयोग केला गेलेला नाहीं आणि परंपरागत, जुनाट पद्धतीनेंच आजही कितीतरी व्यवहार चालू आहेत.

१९४५-४६ च्या चढ पैशानेंही हिंदुस्थानचें दर माणशीं वार्षिक अंदाजी उत्पन्न रु. १९८ पलीकडे जात नाहीं, तर इंग्लंड-अमेरिकेंतील आंकडे अनुक्रमें रु. २,३५५ व रु. ४,६६८ आहेत. श्रीमंत हिंदुस्थानांतील दरिद्री माणसाचें चित्र किती विदारक आहे !

—संजय

## फॅक्टरी अॅक्ट खालील महत्त्वाचा निर्णय

### नागपूर हायकोर्टाचा ताजा निवाडा

फॅक्टरी अॅक्ट खालील एक महत्त्वाचा निवाडा नागपूर हायकोर्टानें क्रिमिनल अपील नं.१२।१९४६ मध्यें नुकताच दिला आहे. जबलपूर इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीचे मॅनेजर यांजवर फॅक्टरी अॅक्टच्या ३४,३५,४७ ह्या कलमांचा भंग केल्याबद्दल वऱ्हाड-मध्यप्रांताच्या फॅक्टरी इन्स्पेक्टरांनीं फिर्याद लावली होती. या प्रकरणांतील मूलभूत घटना उभय पक्षांना मान्य होत्या. त्या अशा:- खमारियाच्या ऑर्डिनन्स फॅक्टरीला वीज पुरवण्यासाठी जबलपूर इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीच्या फॅक्टरी आवारांत नवा बॉयलर संच बसवण्यांत येत होता. तें काम मेसर्स बॅब्कॉक अॅन्ड विल्कॉक्स ह्या पेढीकडे दिलेलें होतें. त्यांचे ३२ कामगार दर दिवशीं १२ तास व दर रविवार सारख्या सुट्टीच्या दिवशीं ६ तास काम करीत होते; परंतु त्यांना वर कामाचा जादा पगार मात्र मिळत नव्हता. वादाचा मुद्दा एवढाच होता कीं, हे लोक फॅक्टरी अॅक्टांतील सांगितलेल्या कामगारांच्या नेहमीच्या व्याख्येमध्यें बसतात कां नाहीं ? आरोपी मॅनेजरांचें म्हणणें होतें कीं फॅक्टरी अॅक्टप्रमाणें मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस (उत्पादन कार्या )मध्यें काम करणारे कामगार तेवढे फॅक्टरी अॅक्टखालीं येतात. बॉयलर बसवणें हें कांहीं उत्पादनाचें काम नाहीं. म्हणून आरोपीकडून फॅक्टरी कायद्याचा भंग झालेला नाहीं. खालच्या कोर्टास हें म्हणणें मान्य झालें व त्यानें आरोपीस सोडून दिलें. तेव्हां मध्यप्रांत सरकारनें नागपूर हायकोर्टाकडे अपील केलें. हायकोर्टानें असा निर्णय दिला कीं प्रत्यक्ष उत्पादनाच्या कामांत गुंतलेल्या कामागारांप्रमाणच उत्पादन निर्वेध होण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या तरतुदींच्या कामांत गुंतलेले कामगारहि फॅक्टरी अॅक्टखालीं येतात ही गोष्ट आरोपींच्या नजरेंतून सुटलेली दिसते. फॅक्टरी अॅक्टांतील कामगारांची व्याख्या उत्पादनाशीं संबंध असलेल्या सर्व कामगारांचा समावेश होण्याएवढी व्यापक आहे. सबब आरोपी दोषी आहेत.

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

–सर्व प्रांतांतील–
सुती – गरम – रेशमी
–खादीचें माहेरघर–

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.